# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर–४१६ ००४.

क्र. कोविमं/ए–२/गोप./प्रात्य./3822
दिनांक :–०२ जून, २०२०

प्रति,

प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळ कक्षेतील,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये.
सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु.– मार्च २०२० च्या आऊट टर्नने घेतलेल्या तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य जमा करणेबाबत.**
**संदर्भ :– क्र.कोविमं/ए–२/गोप./प्रात्य./२९८४ दिनांक १७ जानेवारी २०२०चे पत्र.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये ज्या विद्यार्थ्यांची तोंडी,तंत्र व्यावसायिक तसेच किमान कौशल्यावर आधारीत व्यावसायिक विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा, भाषा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षा नियमित कालावधीमध्ये होऊ शकली नाही अशा विद्यार्थ्यांची **भाषा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षा** आऊट ऑफ **टर्नने** दि.१९/०३/२०२० व दि. २०/०३/२०२० या कालावधीत आयोजित करणेबाबत कळविण्यात आले होते. सदरची **आऊट ऑफ टर्न** परीक्षा पूर्ण झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षोत्तर गोपनीय साहित्य सिलबंद करुन **सोमवार दिनांक २३/०३/२०२०** रोजी आपल्या प्रतिनिधीमार्फत मंडळ कार्यालयात हस्तपोहोच देण्यात यावे असेही कळविण्यात आले होते.

तथापि परीक्षा निकालाच्या अनुषंगाने आपणाकडे जमा असलेल्या **आऊट ऑफ टर्नच्या** विषयनिहाय गुणपत्रिका,उत्तरपत्रिका व चलन सोमवार दिनांक ०८ जून २०२० पर्यंत मंडळाच्या (divsec.kop@gmail.com) या E-mail ID वर पाठविण्यात यावीत. तदनंतर उपरोक्त सर्व मूळ कागदपत्रे तात्काळ मंडळ कार्यालयात जमा करण्यात यावीत. सदरचे साहित्य वेळेत मंडळ कार्यालयाकडे प्राप्त न झालेस व संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालावर विपरीत परिणाम झाल्यास त्यास मंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर